आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# के. के. वाघ संस्थेतर्फे ९५ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार



नाशिक । के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे पद्मश्री देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या १२५ वी जयंती निमित्त संस्थेतर्फे निवृत झालेल्या कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्त सत्कार समारंभ सोमवारी (दि. ३ एप्रिल २०२३ रोजी महाकवि कालिदास कलामंदिर, नाशिक येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी विविध महाविद्यालय व शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर पदांवरुन निवृत्त झालेल्या ९५ कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी पाहुणे म्हणून मेरी नाशिकचे माजी महासंचालक डॉ दि. मा. मोरे होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ व बाळासाहेब वाघ यांचे जीवनपट दाखवत, या कर्मवीरांना आदरांजली अर्पण करण्यात आली. मान्यवरांचा परिचय व स्वागत प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी केले.

विविध महाविद्यालय व शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरुन निवृत्तझालेल्या ९५ कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. त्यामध्ये के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक-२७, के. के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिक-३०, के. के. वाघ विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय, भाऊसाहेबनगर- ११, गिताई कन्या विद्यालय, भाऊसाहेबनगर व के. के. वाघ गुरुकुल मुलामुलींचे वसतिगृह, निफाड यांचे प्रत्येकी-५ , के. के. वाघ माध्यमिक विद्याभवन, पिंपळस(रामाचे), के. के. वाघ अभियांत्रिकी,फार्मसी व तंत्रनिकेतन मुलांचे वसतिगृह, के. के. वाघ कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,नाशिक, के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय नाशिक व के. के. वाघ कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक यांचे प्रत्येकी २, के. के. वाघ कॉलेज ऑफ फार्मसी,नाशिक, के. के. वाघ अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय,नाशिक, के. के. वाघ इंग्लिश स्कूल,नाशिक व के. के.वाघ कृषी आणि कृषी संलग्न महाविद्यालय वसतीगृह,नाशिक यांचे प्रत्येकी- १, के. के.वाघ कृषी महाविद्यालय,नाशिक- ३ येथील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, विश्वस्त शकुंतला वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, माजी प्राचार्य व्ही. डी. बर्वे, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी आभार मानले.

# कृतज्ञता बाळगणे ही जगातली सर्वाधिक चांगली बाब

## डॉ. दि. मा. मोरे : के. के. वाघतर्फे सेवानिवृत्तांचा सत्कार

**नाशिक : वार्ताहर**




जगात सर्वात चांगली बाब म्हणजे कृतज्ञता बाळगणे होय. हाच भाव के के वाघ शिक्षण संस्थेने सेवानिवृत्त सत्कारर्थीच्या सत्कार केलेल्या कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर झळकत असतांना पाहून मला मनस्वी आनंद होत आहे, असे प्रतिपादन मेरी नाशिकचे माजी महासंचालक डॉ दि. मा. मोरे यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे पद्मश्री देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या १२५ वी जयंती निमित्त संस्थेतर्फे निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्त सत्कार समारंभ सोमवार, दिनांक ३ एप्रिल २०२३ रोजी महाकवि कालिदास कलामंदीर, नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, विश्वस्त शकुंतलाताई वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, माजी प्राचार्य व्ही डी बर्वे, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ व कै बाळासाहेब(भाऊ) वाघ यांचे जीवनपट दाखवत, या कर्मवीरांना आदरांजली अर्पण करण्यात आली. मान्यवरांचा परिचय व स्वागत प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक या संस्थेची स्थापना सन १९७० साली झाली. आज संस्था संलग्न ३० विविध शाळा व महाविद्यालय कार्यरत आहेत. यामध्ये अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन, औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय, कृषी व कृषी सलंग्र महाविद्यालये, शिक्षण शास्त्र महाविद्यालय, ललित कला महाविद्यालय, परफॉर्मिंग आर्ट्स महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये, मराठी व इंग्रजी माध्यमाचा शाळा यांचा समावेश आहे. विविध महाविद्यालय व शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरुन निवृत्त झालेल्या ९५ कर्मचा-यांचा मान्यवरांच्या हस्ते संस्थे तर्फे सत्कार करण्यात आला. त्यामध्ये के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय,नाशिक - २७, के के वाघ तंत्रनिकेतन, नाशिक - ३०, के के वाघ विद्याभवन कनिष्ठ महाविद्यालय, भाऊसाहेबनगर- ११, गिताई कन्या विद्यालय, भाऊसाहेबनगर व के के वाघ गुरुकुल मुला-मुलींचे वसतीगृह, निफाड यांचे प्रत्येकी - ५, के के वाघ माध्यमिक विद्याभवन, पिंपळस(रामाचे), के के वाघ अभियांत्रिकी,फार्मसी व तंत्रनिकेतन मुलांचे वसतिगृह, के के वाघ कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,नाशिक, के के वाघ वरिष्ठ महाविद्यालय नाशिक व के के वाघ कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक यांचे प्रत्येकी २, के के वाघ कॉलेज ऑफ फार्मसी,नाशिक, के के वाघ अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय,नाशिक, के के वाघ इंग्लिश स्कूल, नाशिक व के के वाघ कृषी आणि कृषी सलंग्र महाविद्यालय वसतीगृह,नाशिक यांचे प्रत्येकी- १. के के वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक- ३ येथील कर्मचा-यांचा समावेश आहे. डॉ. दि मा मोरे पुढे म्हणाले की, पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ व कै बाळासाहेब(भाऊ) वाघ यांच्या आठवणींना उजाळा दिला.

या पैकी काही कर्मचा-यांच्या वतीने त्यांच्या कुटूंबाने सत्कार स्विकारत व त्यांचा आठवणींना उजाळा दिला. सेवानिवृत्त कर्मचा-यांपैकी माजी प्राचार्य व्ही डी बर्वे, प्रा. मिलिंद मुरुगकर, प्रा. विद्या खपली, जयश्री पानगव्हाणे, सुहास गायधनी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी तर आभार प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी मानले.

पुढारी

# कृतज्ञता बाळगणे ही चांगली बाब : डॉ. दि. मा. मोरे

**नाशिक :** जगात सर्वांत चांगली बाब म्हणजे कृतज्ञता बाळगणे होय. हाच भाव के. के. वाघ शिक्षण संस्थेने सेवानिवृत्तांचा सत्कार केल्याने कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर झळकताना दिसत आहे. हे पाहून मनस्वी आनंद होत आहे, असे प्रतिपादन 'मेरी'चे माजी महासंचालक डॉ. दि. मा. मोरे यांनी केले.

वाघ शिक्षण संस्थेतर्फे पद्मश्री काकासाहेब वाघ यांच्या १२५ व्या जयंतीनिमित आयोजित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सत्कारावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त चांगदेव होळकर, विश्वस्त शकुंतला वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, माजी प्राचार्य व्ही. डी. बर्वे आदी उपस्थित होते. दरम्यान, संस्थेच्या विविध शाळा-महाविद्यालयांतून शिक्षक-शिक्षकेतर पदांवरून निवृत्त झालेल्या ९५ कर्मचाऱ्यांना गौरविले. त्यामध्ये वाघ अभियांत्रिकी (२७), वाघ तंत्रनिकेतन (३०), वाघ विद्याभवन (११), गीताई कन्या विद्यालय, भाऊसाहेबनगर व वाघ गुरुकुल वसतिगृह, निफाड (प्रत्येकी ५) आदींचा समावेश आहे.

Nashik Edition
Apr 5, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## के. के. वाघ अभियांत्रिकीच्या एमसीए विभागास एनबीए मानांकन

**नाशिक : प्रतिनिधी** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी व शिक्षण संशोधन महाविद्यालय, नाशिक येथील एमसीए विभागाच्या पदवीउत्तर विभागास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडेशन (एन.बी.ए) यांचे कडून पुर्नमानांकन (री-ॲक्रिडिटेशन) प्राप्त झाले आहे. या आधी विभागाला शैक्षणिक वर्ष २०१९ ते २०२१ या कालावधीसाठी एनबीए मानांकन मिळाले होते. त्यानंतर सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी मानांकनाची मुदतवाढ मिळाली. एनबीए ने एमसीए प्रोग्रामसाठी त्यांच्या सेल्फी-असेसमेंट रिपोर्टमध्ये दिलेल्या निकषांनुसार संस्थेची शैक्षणिक अभ्यासक्रमाची पूर्तता, पायाभूत सुविधा आणि इतर संबंधित बाबींचे कठोर मूल्यांकन करून त्याआधारावर.मानांकन दिले जात असते. भविष्यात विद्यार्थ्यांना नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध होणार आहेत. संस्थेच्या शिक्षणातील उत्कृष्ठतेची वचनबद्धता आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचा शिक्षण प्रदान करण्याच्या समर्पणाचे हे प्रतिबिंब आहे, असे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी सांगितले. एमसीए विभागप्रमुख डॉ. व्ही. सी. बागल यांनी याबाबत अथक परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी अभिनंदन केले.

आपलं महानगर | www.mymahanagar.com | My महानगर.com

Short News

# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या एमसीए विभागास एनबीए मानांकन

**नाशिक ।** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी व शिक्षण संशोधन महाविद्यालय, नाशिक येथील एमसीए विभागाच्या पदवीत्तर विभागास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी नॅशनल बोर्ड ऑफ अ‍ॅक्रिडेशन (एन.बी.ए)कडून पुर्नमानांकन (री-अ‍ॅक्रिडिटेशन) प्राप्त झाले आहे.

या विभागाला शैक्षणिक वर्ष २०१९ ते २०२१ या कालावधीसाठी एनबीए मानांकन मिळाले होते. त्यानंतर २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी मानांकनाची मुदतवाढ मिळाली. एनबीए ने एमसीए प्रोग्रामसाठी त्यांच्या सेल्फ-असेसमेंट रिपोर्टमध्ये दिलेल्या निकषांनुसार संस्थेची शैक्षणिक अभ्यासक्रमाची पूर्तता, पायाभूत सुविधा आणि इतर संबंधित बाबींचे कठोर मूल्यांकन करून त्याआधारावर.मानांकन दिले जात असते. भविष्यात विद्यार्थ्यांना नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध होणार आहेत. संस्थेच्या शिक्षणातील उत्कृष्टतेची वचनबद्धता आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचा शिक्षण प्रदान करण्याच्या समर्पणाचे हे प्रतिबिंब आहे, असे प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी सांगितले. एमसीए विभागप्रमुख डॉ. व्ही.सी. बागल यांनी याबाबत अथक परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. के एस बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

देशदूत

# वाघ अभियांत्रिकी एमसीए विभागास एनबीए मानांकन

▶▶ नाशिक । दि. ५ प्रतिनिधी

के.के. वाघ शिक्षण संस्था संचलित अभियांत्रिकी व शिक्षण संशोधन महाविद्यालय, नाशिक येथील एमसीए विभागाच्या पदव्युत्तर विभागास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडेशन (एन.बी.ए) कडून पुर्नमानांकन प्राप्त झाले आहे.

या आधी विभागाला शैक्षणिक वर्ष २०१९ ते २०२१ या कालावधीसाठी एनबीए मानांकन मिळाले होते. त्यानंतर सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी मानांकनाची मुदतवाढ मिळाली. या मानांकनामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध होणार आहेत. संस्थेच्या शिक्षणातील उत्कृष्ठतेची वचनबद्धता आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचा शिक्षण प्रदान करण्याच्या समर्पणाचे हे प्रतिबिंब असल्याचे प्राचार्य डॉ. के.एन.नांदुरकर यांनी सांगितले. एमसीए विभागप्रमुख डॉ. व्ही.सी. बागल यांनी याबाबत अथक परिश्रम घेतले.

Deshdoot Edition
Apr 6, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# वाघ अभियांत्रिकीच्या एमसीए विभागास मानांकन

**नाशिक :** के. के. वाघ अभियांत्रिकी व शिक्षण संशोधन महाविद्यालयातील एमसीए विभागाच्या विभागास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रिडेशन (एनबीए) पुर्नमानांकन (री-अॅक्रिडिटेशन) प्राप्त झाले आहे. या आधी विभागाला शैक्षणिक वर्ष २०१९ ते २०२१ या कालावधीसाठी एनबीए मानांकन मिळाले होते. त्यानंतर २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी मानांकनाची मुदतवाढ मिळाली. एमसीए प्रोग्रॅमसाठी त्यांच्या सेल्फ- असेसमेंट रिपोर्ट (SAR ) मध्ये दिलेल्या निकषांनुसार संस्थेची शैक्षणिक अभ्यासक्रमाची पूर्तता, पायाभूत सुविधा आणि इतर संबंधित बाबींचे कठोर मूल्यांकन करून त्या आधारावर मानांकन दिले जात असते. संस्थेच्या शिक्षणातील उत्कृष्ठतेची वचनबद्धता आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचा शिक्षण प्रदान करण्याच्या समर्पणाचे हे प्रतिबिंब आहे, असे प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी सांगितले. एमसीए विभागप्रमुख डॉ. व्ही.सी. बागल यांनी याबाबत परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. नांदुरकर यांनी विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# के. के. वाघ अभियांत्रिकी विभागाच्या एमसीए विभागास एनबीए मानांकन

**नाशिक ।** के. के. वाघ अभियांत्रिकी व शिक्षण संशोधन महाविद्यालयातील एमसीए विभागाच्या पदव्युत्तर विभागास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडेशन (एन.बी.ए) यांच्याकडून पुनर्मानांकन (रि-ॲक्रिडिटेशन) प्राप्त झाले आहे. याआधी विभागाला शैक्षणिक वर्ष २०१९ ते २०२१ या कालावधीसाठी एनबीए मानांकन मिळाले होते. एनबीएने एमसीए प्रोग्रामसाठी त्यांच्या सेल्फी-असेसमेंट रिपोर्टमध्ये दिलेल्या निकषांनुसार संस्थेची शैक्षणिक अभ्यासक्रमाची पूर्तता, पायाभूत सुविधा आणि इतर संबंधित बाबींचे कठोर मूल्यांकन करून त्याआधारावर मानांकन दिले जाते.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# के. के. वाघ अभियांत्रिकीतर्फे विद्यार्थी, पालकांचा सत्कार



नाशिक। शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असणाऱ्या नाशिक येथील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात सालाबादाप्रमाणे यंदा ही अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै २०२२ महिन्यामध्येच कॅम्पस प्लेसमेंट सुरुवात झाली. जुलै २०२२ ते मार्च २०२३ या दरम्यान ७५ हुन अधिक कंपनींचे कॅम्पस मुलाखती पार पडल्या. त्यापैकी सुमारे ४७५ विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्ण संधी प्राप्त झाली. त्यापैकी नाशिकबाहेरील ९० हून अधिक विद्यार्थी व पालक यांचा सत्कार सोहळा औरंगाबादकर सभागृह, शालिमार, नाशिक येथे आयोजित करण्यात आला होता.

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनात बालवाडी ते महाविद्यालयाच्या प्रवासामध्ये त्याचा प्रथम गुरु म्हणजे आई-वडील आणि त्यानंतर शिक्षक हे असतात. म्हणजेच विद्यार्थ्यांना घडविण्यात या तियांचा सिंहाचा वाटा असतो. या उपक्रमामुळे विद्यार्थी यांच्या मेहनतीचे कौतुक होते. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयास सावित्रीबाई फुले विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त दर्जा मिळाला आहे. त्या अंतर्गत अनेक नाविन्य पूर्ण उपक्रम राबवण्यात येणार आहेत अशी माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी दिली.

या विद्यार्थ्यांना सरासरी चार ते जास्तीत जास्त १८ लाख रुपये वार्षिक वेतनमानासाठी विविध कंपन्यांमध्ये निवड झालेली आहे. अशी माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव. प्रा. के. एस. बंदी यांनी अभिनंदन केले. के. के. वाघ महाविद्यालयाचे विविध शाखेचे विभाग प्रमुख यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# वाघ महाविद्यालयात कर्मवीर एक्स्पो

**नाशिक : प्रतिनिधी**

कर्मवीर काकासाहेब वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात २००३ पासून आयईटी कर्मवीर एक्स्पोचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत राज्यातूनच नव्हे तर संपूर्ण देशभरातून तंत्रज्ञानावर आधारित विविध प्रकल्प विद्यार्थी घेऊन येतात.

कृषी, विज्ञान, शैक्षणिक, औद्योगिक इत्यादी क्षेत्रांवर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नावीन्यपूर्वक प्रकल्प विद्यार्थी सादर करत असतात. या अनुषंगाने नाशिकनगरीतील शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर आणि स्थानिक रहिवासी उत्स्फूर्तपणे या उपक्रमाला हजेरी लावत असतात. कर्मवीर काकासाहेब वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रत्येक विभागातून दरवर्षी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन होत असते. यामध्ये आयईटी कर्मवीर एक्स्पो हा उपक्रम महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागाने २००३ साली सुरू केला आहे. परंतु कोविडमुळे हा उपक्रम २०२० पासून मानवी सुरक्षिततेच्या अनुषंगाने खंडित करण्यात आला होता. २० वर्षांच्या या ऐतिहासिक पर्वाचे पुनश्च आयोजन करण्यात आले असून, शनिवार दि. २९ एप्रिल २०२३ या दिवशी उपक्रमाचे सकाळच्या सत्रात उद्घाटन होणार आहे. उद्घाटन क्रॉम्पटन ग्रीव्हजचे अध्यक्ष मुकुल श्रीवास्तव, अध्यक्ष, पॉवर डिव्हिजन, क्रॉम्प्टन ग्रीव्हज यांच्या हस्ते होणार आहे. एकदिवसीय कार्यक्रमात दिवसभर अनेक तांत्रिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमास अत्याधुनिक व नावीन्यपूर्वक असे प्रकल्प सहभाग नोंदवले जातील, असे प्रतिपादन उपक्रमाचे आयोजक डॉ. शरद हमाळ यांनी केले आहे. या भव्य-दिव्य अशा उपक्रमास सर्व नागरिकांनी आवर्जून हजेरी लावावी व भावी तंत्रज्ञांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन विद्युत विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख डॉ. रवींद्र मुंजे यांनी केले आहे. या ऐतिहासिक वारसा असलेल्या उपक्रमाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन विभागाचे विभागप्रमुख डॉ. बन्सीधर कुशारे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी केले आहे. या उपक्रमास संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**महत्त्वाचे**

## आयईटी कर्मवीर एक्स्पोचे आज उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी**

कर्मवीर काकासाहेब वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्युत अभियांत्रिकी विभाग व इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (युके) यांच्या संयुक्त विद्यमाने आयईटी कर्मवीर एक्स्पोचे आयोजन केले आहे. या उपक्रमांतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या विविध प्रकल्पांचे व पोस्टरचे प्रदर्शन स्पर्धा आयोजित केल्या आहेत. सर्व स्पर्धा मिळून जवळपास ४५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये भाग घेतला आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक २९ एप्रिल २०२३ रोजी सकाळी १० वाजता क्रॉम्प्टन ग्रीव्हजचे अध्यक्ष मुकुल श्रीवास्तव यांच्या हस्ते होणार आहे. सर्व स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या या भावी तंत्रज्ञांना प्रोत्साहित करण्यासाठी सर्व विद्यालयीन, महाविद्यालयीन, औद्योगिक क्षेत्रांतील मान्यवर व स्थानिक रहिवासी यांनी हजर राहावे, असे आवाहन के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर व विभागप्रमुख डॉ. कन्हैया कुमार यांनी केले आहे.

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...

**आपलं महानगर | My महानगर.com**

www.mymahanagar.com

---

**Short News**

# आयईटी कर्मवीर एक्स्पोचे आज उद्घाटन

नाशिक । कर्मवीर काकासाहेब वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्युत अभियांत्रिकी विभाग व इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीरिंग अँड टेकनॉलॉजी (युके) यांच्या संयुक्त विद्यमाने आयईटी कर्मवीर एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या विविध प्रकल्पांचे व पोस्टरचे प्रदर्शन स्पर्धा होणार आहे. सर्व स्पर्धा मिळून जवळपास ४५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये भाग घेतला आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन शनिवारी (दि.२९) सकाळी १० वाजता क्रॉम्प्टन ग्रीव्हजचे अध्यक्ष मुकुल श्रीवास्तव यांच्या हस्ते होणार आहे. स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या स्पर्धकांना प्रोत्साहित करण्यासाठी सर्व विद्यालयीन, महाविद्यालयीन, औद्योगिक क्षेत्रांतील मान्यवर व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी केले आहे.

# आयईटी कर्मवीर एक्स्पोचे आज उद्घाटन

नाशिक, ता. २८ : कर्मवीर काकासाहेब वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्युत अभियांत्रिकी विभाग व इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी (यूके) यांच्या संयुक्त विद्यमाने आयईटी कर्मवीर एक्स्पोचे आयोजन केले आहे.

उपक्रमाअंतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या विविध प्रकल्पांचे व पोस्टरचे प्रदर्शन स्पर्धा आयोजित केल्या आहेत. सर्व स्पर्धा मिळून जवळपास ४५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये भाग घेतला आहे. कार्यक्रमाचे उदघाटन शनिवारी (ता. २९) सकाळी १० वाजता क्रॉम्प्टन ग्रीव्हजचे अध्यक्ष मुकुल श्रीवास्तव यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर व विभागप्रमुख डॉ. बन्सीधर कुशारे यांनी केले आहे.

# आज 'आयईटी एक्सो'

नाशिक : कर्मवीर काकासाहेब वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्युत अभियांत्रिकी विभाग व इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (यूके)तर्फे आज, शनिवारी (दि. २९) आयईटी कर्मवीर एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. क्रॉम्प्टन ग्रीव्हजचे अध्यक्ष मुकुल श्रीवास्तव यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता या एक्स्पोचे उद्‌घाटन होईल. या एक्स्पोत साडेचारशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून, त्यांचे विविध प्रकल्प, पोस्टर्सचे प्रदर्शनही भरणार आहे.

# कर्मवीर एक्स्पोतून स्टार्टअपसाठी प्रोत्साहन : श्रीवास्तव

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात वैज्ञानिक आविष्कारांना प्रोत्साहन देणाऱ्या आयईटी कर्मवीर एक्स्पोचे शनिवारी सकाळी दि. २९ एप्रिल रोजी उद्घाटन झाले. आयईटी कर्मवीर एक्स्पोचे उद्घाटन क्रॉम्प्टन ग्रीव्हजच्या पॉवर विभागाचे अध्यक्ष मुकुल श्रीवास्तव यांच्या हस्ते पार पडले. यावेळी, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोकभाई मर्चंट, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर व विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. बन्सीधर कुशारे उपस्थित होते. कोरोनानंतर अभियांत्रिकी क्षेत्रात आमूलाग्र बदल झालेले आहेत. हे बदल प्रामुख्याने जरी इन्फॉर्मेशन अँड टेक्नॉलॉजीमध्ये दिसत असले तरी त्याहून अधिक बदल हे मुख्य अभियांत्रिकी म्हणजेच विद्युत, यांत्रिकी आणि इतर क्षेत्रात झालेले आहेत. आणि त्यामुळे येणाऱ्या काळात या क्षेत्रातील मागणी वाढणार आहे. त्याचबरोबर के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्युत विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या अशा नावीन्यपूर्ण उपक्रमाद्वारे स्पर्धकांना स्टार्टअपसाठी प्रोत्साहन मिळते, असे मत मुकुल श्रीवास्तवयांनी व्यक्त केले. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी मागील काही दिवसांतील संस्थेच्या प्रगतीचा आलेख सादर केले. डॉ. कुशारे यांनी स्पर्धकांना संबोधताना सांगितले की, आपल्या देशाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यासाठी आपल्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी मूलभूत अडचणींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि समाजाला उपयोगी व किफायतशीर उपाय शोधला पाहिजे.

आयईटी कर्मवीर एक्स्पोच्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी, जॉन येसूराज, मिस. प्रेमलता मिश्रा, पीयूष शिंदे, सर्वेश सुखात्मे आणि प्रसाद जोशी परीक्षक म्हणून उपस्थित होते. प्रातिनिधिक स्तरावर डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी यांनी परीक्षणाचे स्वरूप सर्व स्पर्धकांना समजावून सांगितले. या आयईटी कर्मवीर एक्स्पोसाठी ऐकून ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. उद्घाटन झाल्यानंतर सर्व मान्यवरांनी विविध प्रकल्पांना भेट दिली व स्पर्धकांचे कौतुक केले.

---

## आयईटी कर्मवीर एक्स्पोचे उद्घाटन, विद्यार्थ्यांचा सहभाग

# विद्यार्थ्यांकडून आविष्काराचे दर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

**नाशिक, ता. २९ : महाविद्यालयीन जीवनात अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असताना, प्राप्त ज्ञानाच्या आधारे विद्यार्थ्यांकडून संशोधनात्मक प्रकल्प साकारले जातात. या प्रकल्पांचे सादरीकरण के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय येथे आयोजित केलेल्या आयईटी कर्मवीर एक्स्पो या प्रदर्शनात करण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पक बुद्धीने आविष्कार सादर करत उपस्थितांचे लक्ष वेधले.**

[illegible]



पंचवटी : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित आयईटी कर्मवीर एक्स्पो प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मान्यवर.

[illegible]

# कर्मवीर एक्स्पोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवउद्यमासाठी प्रोत्साहन - मुकुल श्रीवास्तव

लोकसत्ता प्रतिनिधी



नाशिक - करोनानंतर अभियांत्रिकी क्षेत्रात अमूलाग्र बदल झाले आहेत. हे बदल प्रामुख्याने जरी माहिती तंत्रज्ञानमध्ये दिसत असले तरी त्याहून अधिक बदल हे मुख्य अभियांत्रिकी म्हणजेच विद्युत, यांत्रिकी आणि इतर क्षेत्रात झालेले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात या क्षेत्रातील मागणी वाढणार आहे. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्युत विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या अशा नावीन्यपूर्ण उपक्रमाद्वारे स्पर्धकांना नवउद्यमासाठी प्रोत्साहन मिळते, असे मत क्रॉम्प्टन ग्रीव्हजचे मुकुल श्रीवास्तव यांनी व्यक्त केले.

येथील क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात वैज्ञानिक आविष्कारांना प्रोत्साहन देणाऱ्या आय.ई.टी. कर्मवीर एक्स्पोचे शनिवारी सकाळी उद्घाटन झाले. याप्रसंगी श्रीवास्तव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोकभाई मर्चंट, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.केशव नांदुरकर, विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. बन्सीधर कुशारे उपस्थित होते. श्रीवास्तव यांनी कर्मवीर एक्स्पोमधील वेगवेगळ्या प्रकल्पांची पाहणी केली. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नांदुरकर यांनी मागील काही दिवसातील संस्थेच्या प्रगतीचा आलेख सादर केला. डॉ. कुशारे यांनी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी मूलभूत अडचणींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे सांगितले.

कर्मवीर एक्स्पोतंर्गत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी, जॉन वेमूराज, प्रेमलता मिश्रा, पियुष शिंदे, सर्वेश सुखात्मे आणि प्रसाद जोशी उपस्थित होते. प्रातिनिधीक स्तरावर डॉ. कुलकर्णी यांनी परीक्षणाचे स्वरूप सर्व स्पर्धकांना समजावून सांगितले. एक्स्पोसाठी एकूण ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे.

### दोन वर्षानंतर पुन्हा कर्मवीर एक्स्पो

करोनामुळे मागील दोन वर्ष खंड पडल्यानंतर कर्मवीर एक्स्पो यंदा पुन्हा सुरू झाला आहे. नाशिकसह देशभरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला आहे. पर्यावरणपूरक, अत्याधुनिक संकल्पनांवर यामध्ये काम करण्यात आले आहे.